# « SUR LES PAS DE L'INDE » - « THE STEP TO INDIA »

INDIAN PRESS MAHARASHTRA (NASIK)



'आनंदतांडवम्' हे नृत्य सादर करताना फ्रेंच दांपत्य पॅट्रिक व निर्मला ग्लेझ.

## फ्रेंच दांपत्याचे भरतनाट्यम्

**नाशिक, दि. ३ (प्रतिनिधी)** - फ्रेंच दांपत्याने प्राचीन भारतीय शास्त्रीय नृत्य भरतनाट्यम्मधील अवघड अंग-प्रत्यंगाच्या हालचाली तालबद्धरीतीने मांडत नाशिककरांकडून कौतुकाची पावती मिळविली. शिवालय नृत्यकलामंदिर आणि भारत-फ्रान्स सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भारत-फ्रान्स नृत्योत्सवात फ्रान्सच्या मार्सेल शहरातील कलावंत पॅट्रिक व निर्मला ग्लेझ यांनी भरतनाट्यम्मधील कौशल्याने व नाट्याभिनयाने उपस्थितांना थक्क केले. प्रारंभी त्यांनी कालीमातेला वंदन करतानाच अलरिपु हा शुद्ध नृत्यातील प्रकार पेश केला. पॅट्रिक यांनी रुद्रशिवावतार व शिवलिंग प्रार्थना नृत्याद्वारे सादर केली. निर्मला ग्लेझ यांनी तामिळ भाषेतील असाईमुगम हे पद्य सादर करून श्रीकृष्णाप्रती असीम भक्तीची भावना व्यक्त केली. सहज अभिनयातून श्रीकृष्णाचे सौंदर्य वर्णन करतानाच त्यांनी राधेची व्यथाही समर्थपणे मांडली. ग्लेझ दांपत्याचे गुरू कै. मुथ्थुस्वामी यांनी शिकविलेली कला त्यांनी 'भजे गोविंदम्' या खास फ्रेंच भाषेतील रचनेवर भरतनाट्यम् नृत्यातून सादर करत उपस्थितांची मने जिंकली. प्रारंभी जिल्हा व सत्र न्यायाधीश भडंग व सौ. भडंग, न्या. सौ. जवळकर, अॅड. बालाजीवाले यांच्या हस्ते नटराजपूजन करण्यात आले.

## BEAUTIFUL PERFORMANCE OF BHARATANATYAM BY FRENCH COUPLE

**The French couple impressed Nasikaites by presenting very ancient classic dance Bharatanatyam. This couple was praised by their presentation of difficult movement of major and minor lines synchronizing with rythm. This was organized by IFCA. Nasikais were surprised and choked how they began with alaripu. Shivalinga prarthana was the "special menu". Nirmala presented Asai mugham, an ancient tamil language. I felt as if Nirmala was a devote of Sri Krishna; her expression were gracefull, suitable to an Indian dancer. They won the heart of all the Nasikaites.**

*LOKAMAT Nasik and Maharashtra newspaper*